कालमर्यादा/महत्वाचे

क/पोमसं/१/१५५/गो.अ.ऑनलाईन/२०१६
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा,मुंबई - ०१.
दिनांक - २९.०३.२०१६.

# परिपत्रक

विषय :- भापोसे अधिका-यांचे सन २०१५-१६ या वर्षाचे गोपनीय अहवाल ऑनलाईन लिहिणेबाबत.
(Submission of PAR through SPARROW)

केंद्रीय गृह मंत्रालय यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे सन २०१५-१६ या कालावधीचे सर्व भापोसे अधिका-यांचे गोपनीय अहवाल (PAR) संपूर्ण देशभर संगणकाद्वारे ऑनलाईन भरणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. म्हणजेच सन २०१५-१६ चे PAR हे कागदावर सादर न करता ते संगणकावर ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाचे आहेत. याबाबतची सर्वसाधारण माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) सदरच्या यंत्रणेस Smart Performance Appraisal Report Recording Online Window (SPARROW) असे नाव देण्यात आलेले आहे.

२) त्यासाठी NIC द्वारे **ips.gov.in** हे संकेतस्थळ सुरु करण्यात आले आहे. या संकेतस्थळावर संबंधित अधिका-यांनी जाऊन त्यामध्ये आपले PAR सादर करायचे आहेत. तसेच प्रतिवेदीत अधिकारी, पुनर्विलोकन अधिकारी व स्विकृती अधिकारी यांनीही त्या संकेतस्थळावर जाऊन आपआपली कार्यवाही पूर्ण करायची आहे.

३) ऑनलाईन PAR चे प्रपत्र (Form) यापूर्वी दरवर्षी सादर करण्यात येणा-या PAR सारखेच आहेत. त्यामध्ये कोणताही बदल नाही. फक्त कागदावर सादर करण्याऐवजी संगणकावर सादर करायचे आहेत एवढाच बदल आहे.

४) सर्व भापोसे अधिका-यांनी PAR सादर करण्यासाठी त्यानंतर प्रतिवेदीत अधिका-यांनी प्रतिवेदनासाठी, पुनर्विलोकन अधिका-यांनी पुनर्विलोकनासाठी तसेच स्विकृत अधिका-यांनी स्विकृत करण्यासाठी विशिष्ट कालमर्यादा ठरवून देण्यात आलेली आहे व सर्व अधिका-यांनी ती कालमर्यादा पाळणे बंधनकारक आहे.

५) स्विकृत केलेले PAR स्विकृत झाल्यानंतर संबंधित अधिका-यांना संकेतस्थळाद्वारे/ईमेलद्वारे कळविण्यात येईल व असे कळविण्यात आलेल्या अहवालावर जर एखादया अधिका-यांस अभिवेदन करायचे असल्यास त्या संदर्भातील सर्व माहिती ऑनलाईन पध्दतीने सादर करायचे आहे व त्यावर सक्षम अधिकारी विचार करुन निर्णय घेतील व ती बाब ऑनलाईन पध्दतीनेच ईमेलद्वारेच व संकेतस्थळावर संबंधित अधिका-यास उपलब्ध राहील.

६) यातील प्रत्येक टप्प्याबाबत संबंधित अधिका-यांना एसएमएस/ईमेलद्वारे अलर्ट पाठविले जातील.

७) सर्व अधिका-यांनी सर्व प्रथम संकेतस्थळावर त्यांचेसाठी उघडण्यात आलेल्या व्यक्तिगत NIC ईमेलद्वारे व पासवर्डद्वारे लॉग इन करुन ज्यामध्ये आपली माहिती भरणे आवश्यक आहे.

८) खालीलप्रमाणे कालमर्यादा आखून देण्यात आली आहे.

| उपकम | ASP/SP | DIG/IG | ADG |
|---|---|---|---|
| | Below super Time Scale | super Time Scale | |
| PAR सादर करणे | ३० एप्रिल | ३१ मे | १५ जून |
| प्राप्त PAR प्रतिवेदन करणे | ३१ मे | ३० जून | १५ जुलै |
| प्रतिवेदीत PAR पुनर्विलोकन करणे | ३० जून | ३१ जुलै | १५ ऑगस्ट |
| स्विकृत PAR स्विकृत करणे | ३१ जुलै | ३१ ऑगस्ट | १५ सप्टेबर |
| अधिका-यांना त्यांची प्रत | १५ ऑगस्ट | १५ सप्टेबर | ३० सप्टेबर |
| अभिवेदन करणे. | १५ सप्टेबर | १५ ऑक्टोबर | १५ ऑक्टोबर |
| सर्व प्रकिया पूर्ण करणे | ३१ मार्च | ३१ मार्च | ३१ मार्च |

केद शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे अचूक कार्यवाही करण्याकरीता सर्व भापोसे अधिका-यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

i) सर्वप्रथम सर्व भापोसे अधिका-यांनी त्यांची वैयक्तिक माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये भरुन ती दि.५ एप्रिल २०१६ पूवी ईमेलद्वारे ig.establishment@mahapolice.gov.in या ईमेलवर पाठवायची आहे, सदरची माहिती पाठविणे बंधनकारक आहे व दिलेल्या कालमर्यादेत सादर करायची आहे.

ii) सर्व भापोसे अधिका-यांकडे NIC चे ईमेल असणे आवश्यक आहे. सदरचे ईमेल त्यांच्या व्यक्तिगत नावावर असणे आवश्यक आहे. शासकीय ईमेल चालणार नाही (पदनामानुसारच असणारे ईमेल चालणार नाही.उदा. ig.establishment.nic.in) याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाकडून सर्व भापोसे अधिका-यांचे उपलब्ध ईमेल (NIC कडील उपलब्ध ईमेल) यांची यादी तयार करण्यात येत आहे व सर्व अधिका-यांना त्यांच्या शासकीय ईमेलवर त्या संदर्भातील माहिती पाठविण्यात आली आहे.

iii) सदर ईमेल सुरु करताना आपल्या व्यक्तिगत मोबाईलवर त्याचा पासवर्ड पाठविला जाईल व त्या पासवर्डद्वारे ips.gov.in या संकेतस्थळावर जाऊन आपले रजिस्ट्रेशन करावयाचे आहे व त्यानंतर PAR सादर करायचे आहे.

iv) सर्व भापासे अधिका-यांकडे Digital Signature Certificate असणे अत्यावश्यक आहे व PAR सादर करताना सर्व भापोसे अधिका-यांना PAR सादर करतांना प्रतिवेदीत करतांना, पुनर्विलोकन करतांना व स्वीकृत करतांना त्या Digital Signature चा वापर करणे बंधनकारक आहे.

v) Digital Signature प्राप्त करण्यासाठी भापोसे अधिका-यांनी cca.gov.in संकेतस्थळावर त्या संदर्भातील माहिती घेऊ शकतील व त्या संबंधित संस्थेशी (Agency) संपर्क साधून त्यांचेकडून त्वरीत Digital Signature प्राप्त करुन घेउ शकता. यासाठी सुमारे ५०० ते १५०० रुपये खर्च अपेक्षित आहे व सदरचा खर्च अधिका-यांनी सर्वप्रथम स्वतः करुन त्यानंतर त्यांच्या कार्यालयीन खर्चातून सदरच्या खर्चाची प्रतिपूर्ती करुन घेऊ शकतील.

या संदर्भात पोलीस महासंचालक कार्यालय आस्थापना शाखेत सर्व माहिती उपलब्ध असून विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्था) यांच्या शासकीय दूरध्वनीवर संपर्क साधून माहिती घेऊ शकता अथवा अधिका-यांना संपर्क साधण्यासाठी या कार्यालयात ठेवण्यात आलेला भ्रमणध्वनी कमांक ७५०६५२४३३३यावर व्हॉटसअपद्वारे अथवा एसएमएसद्वारे प्रश्न विचारावेत व त्याचे उत्तर दिले जाईल व शंकेचे निरसन केले जाईल. तसेच या संदर्भातील माहिती mha.nic.in या संकेतस्थळावर पोलीस डिवीजन - I या सेक्शनमध्ये SPARROW या सदराखाली उपलब्ध आहे व त्यावर भेट देऊन त्या संदर्भातील माहिती घेऊ शकता.

या संदर्भात उपलब्ध Manual सर्व अधिका-यांना त्यांच्या शासकीय ईमेलवर सुध्दा पाठविण्यात आले आहे त्याचे अवलोकन करु शकता.

ऑनलाईन PAR सादर करणे बंधनकारक असल्याने व त्यामध्ये त्रुटी आढळून आल्यास संबंधित अधिका-याचे व्यक्तिगत नुकसान होण्याची शक्यता असल्याने वरील सूचनांकडे सर्व अधिका-यांनी गांभीर्याने लक्ष द्यावे व तंतोतंत पूर्तता करावी.

29/3/2016

**[राजकुमार व्हटकर]**
विशेष पोलीस महानिरीक्षक [आस्था]
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रपत्र-'अ'

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Name of the officer reported upon | | |
| 2 | Service | | |
| 3 | Cadre | | |
| 4 | Year of allotment | | |
| 5 | Date of Birth | | |
| 6 | Present Grade | | |
| 7 | Posts held during the year (1.4.2015 to 31.3.2016) | Posting/s | Period/s (From - To) |
| | 1 | | |
| | 2 | | |
| | 3 | | |
| 8 | Date of appointment to present post : | | |
| 9 | | Name & Designation | Period Worked |
| | Reporting Authority | 1.<br>2.<br>3. | |
| | Reviewing Authority | 1.<br>2.<br>3. | |
| | Accepting Authority | 1.<br>2.<br>3. | |